# गोफ्रूगल तर्फे वित्तीय उत्पादनांच्या नव्या ईझी सुटचे बाजारात आगमन

**पुणे । प्रतिनिधी**

भारताची सर्वात वेगाने विस्तारणारी क्लाउड ईआरपी कंपनी (उद्योगांसाठी संसाधनांचे नियोजन करणारी कंपनी) गोफ्रूगलने रिटेलइझी, सर्व्हइझी आणि मॅनेज इझी या आपल्या अनुक्रमे किरकोळ विक्री, रेस्टॉरंट आणि वितरण व्यवसायासाठीच्या नव्या उत्पादनांच्या 'ईझी सुट' अर्थात सुलभ संचांच्या बाजारातील आगमनाची घोषणा केली. रिटेलर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे सीईओ श्री. कुमार राजगोपालन यांनी एआय आणि एमएल यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा पारंपरिक किरकोळ विक्री उद्योगक्षेत्रात पहिल्यांदाच वापर करणा–या पहिल्यावहिल्या प्रायोगिक डिजिटल स्टोअरचे अनावरण केले.

संशोधन अहवालांच्या आकडेवारीनुसार भारतीय किरकोळ विक्री क्षेत्रातील १४ दशलक्षांहून अधिक किरकोळ व्यावसायिकांद्वारे ७०० बिलियन डॉलर्सची उलाढाल केली जाते. या बाजारपेठेच्या एकूण गरजेपैकी ६०–९०% वाटा एमएसएमईकडून (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग) उचलला जातो. किरकोळ विक्रीव्यवसाय आज बदलांच्या उंबरठ्यावर उभा आहे, तर रेस्टॉरंट उद्योग सतत प्रगत होत जाणा–या तंत्रज्ञानाशी ब–यापैकी जुळवून घेत आहे.

क्लाउड किचन्स आणि ऑनलाइन डिलिव्हरी प्लॅटफॉर्ममध्ये होत असलेल्या वाढीमुळे ग्राहक या सेवेला वेगळ्या प्रकारे प्रतिसाद देत असल्याचा प्रत्यय पारंपरिक रेस्टॉरंट्सना पदोपदी येत आहे. आज ग्राहकांना केवळ प्रत्यक्ष दुकानांकडूनच नव्हे तर ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म्स आणि बाजारपेठांकडूनही त्यांच्या वैयक्तिक गरजांकडे लक्ष देणा–यासेवेची, उत्पादनांच्या उपलब्धतेची आणि प्रमाण सेवेची अपेक्षा आहे.